N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** नारपोली
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0618 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/08/2023 09:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 28/07/2023
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/07/2023
**Time From (वेळेपासून):** 10:43 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 10:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 10/08/2023 **Time (वेळ):** 08:51 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 009
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/08/2023 08:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 07 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** ग्राम पंचायत दिवे अंजुर, ता भिवंडी, जिल्हा-ठाणे,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राहुल किसन म्हात्रे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | घर नं 250, मोतीराम निवास,दिवे अंजुर,ता भिवंडी जिल्हा ठाणे,नारपोली , ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | घर नं 250, मोतीराम निवास,दिवे अंजुर,ता भिवंडी जिल्हा ठाणे,नारपोली , ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9270707052

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रेश्मा सदानंद पाटील | | | 1. दिवे अंजुर,ता भिवंडी, जिल्हा-ठाणे,,नारपोली ,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | आकाश जनार्दन म्हात्रे | | | 1. दिवे अंजुर,ता भिवंडी, जिल्हा-ठाणे,,नारपोली ,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 3 | सदानंद पाटील | | | 1. दिवे अंजुर,ता भिवंडी, जिल्हा-ठाणे,,नारपोली ,ठाणे शहर, |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

नारपोली पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर.618/2023 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे (संशोधन 2018) कलम 7 व 12 प्रमाणे

फिर्याद दिनांक - 10/08/2023

मी, राहुल किसन म्हात्रे, वय 31वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा. घर नं. 250, मोतीराम निवास, दिवे अंजुर, ता. भिवंडी. जिल्हा ठाणे. मो.क्र. 9270707052 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी,श्री. अरूण रामकृष्ण पाटील, रा. अंजुर दिवे, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे यांचे मालकीचे अ.के.अँण्ड कंपनी, दापोडे, ता. भिवंडी, जिल्हा-ठाणे या कंपनीत कॉन्ट्रक्ट पध्दतीने 10 वर्षा पासुन काम करतो. श्री. अरूण रामकृष्ण पाटील यानी त्यांचे मालकीचे सर्वे नं. 180/1/फ मौजे दिवे अंजुर याजागेत भाडे तत्वावर देण्यात येणाऱ्या जागेतील परवानगी घेणे, शासकीय कार्यालयात अर्ज करणे, इतर कामाकरीता मला नियुक्ती व अधिकारी पत्र दिले आहे. श्री. अरूण रामकृष्ण पाटील यानी त्यांचे मालकीचे सर्वे नं. 180/1/फ मौजे दिवे अंजुर ही जागा मेर्सस आय.टच. पब्लिसिटी याकंपनीस होल्डींग लावण्याकरीता भाडे तत्वावर दिली आहे. आय.टच. पब्लिसिटी याकंपनीस श्री. अरूण पाटील यांनी सदर जागेवर होल्डींग लावणेकामी परवानगी दिले बाबतचे पत्र, व आय.टच. पब्लिसिटी यांनी होल्डींग लावणेकरीता नाहरकत दाखला मिळणे कामी मा. सरपंच, ग्रामपंचायत दिवे अंजुर, ता. भिवंडी, जिल्हा-ठाणे यांचे नावे दिलेले पत्र मी दिनांक 14/06/2023 रोजी ग्रामपंचायत मध्ये जमा करून त्याची पोच घेतली. त्यांनतर मी सरपंच मॅडम श्रीमती रेश्मा सदानंद पाटील याना भेटलो असता श्रीमती रेश्मा पाटील यांनी असे फलक (होल्डींग) लावण्याची परवानगी देण्याचे आम्ही पैसे घेतो असें सांगितले. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, ग्राम पंचायतीचे फि' असेल ती मी भरायला तयार आहे. तेव्हा रेश्मा पाटील यांनी सांगितले की, ग्राम पंचायतीचे फि'व्यतीरिक्त मला 1,50,000/ रूपये (दिड लाख रूपये) दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे लाचेची मागणी केली. मला त्याना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक 27/07/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात स्व: हस्ताक्षरात संरपच श्रीमती रेश्मा पाटील यांचे विरूध्द कारवाइ होणेकामी लेखी तक्रार दिली आहे.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 28/07/2023 रोजी कायदेशीर बांबीची पुर्तता करून मला डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर 10.43वा. लावुन दिलेवर मी व पंच श्री. राउत असे माझे मोटर सायकल क्र. MH 04-L J-5636 यावर बसुन ग्रामपंचायत अंजुर दिवे कार्यालयात गेलो. तेथे सरपंच मॅडम श्रीमती रेश्मा पाटील यांना भेटुन होर्डींगचे (NOC) नाहरकत दाखल्याबाबत चर्चा केली असता ग्राम पंचायतीत मासिक सभा असल्याने त्यांनी थांबा जरा असे सांगितले. मी व पंच असे ग्राम पंचायतीत थांबलो. ग्राम पंचायत सदस्य श्री. आकाश जनार्दन म्हात्रे यानी भेटुन एनओसी बाबत विचारणा केली. आकाश याने मॅडम तुला आकडा बोलल्या का? त्यावेळी मी त्यांना मॅडमनी

दिड (दिड लाख) बोलल्या असे सांगुन त्यात काहीतरी कमी करा असे बोललो असता आकाश याने ''ठिक आहे. त्यात 25 कमी कर'' असे सांगुन ''माझेकडे आणुन दे'' असे सांगितले. त्यानंतर मी व पंच अ.के.अँण्ड कंपनीचे कार्यालयात परत आलो.

तक्रारीतील लोकसेविका श्रीमती रेश्मा पाटील यांनी माझेकडे लाचेच्या मागणी संदर्भात चर्चा केली नसल्याने मी माझे मोबाईल क्र. 9270707052 यावरून लोकसेविका श्रीमती रेश्मा पाटील यांचे मोबाईल क्र. 7028279566 यावर फोन केला असता श्रीमती रेश्मा पाटील यांनी फोन उचलुन त्यांचे पती श्री. सदानंद पाटील यांना फोन दिला. तेव्हा मी त्यांना एनओसी बाबत विचारणा करून आकाश याने सव्वा लाख रूपये घेवुन ये असे सांगितले. ते वहिनीला (लोकसेविका)पण माहिती आसु दे ना. वहिनीची सरपंच असल्यामुळे त्यांची सही लागेल. वहिनीला विचारू दे आकाश दादाशी बोलुन घे. पैसे आकाश दादाकडे देवु कि वहिनीकडे देवु त्यावर लोकसेविका यांचे पती श्री. सदानंद पाटील यांनी ''आकाशकडे दे'' असे संभाषण केले.

काहीवेळाने माझे मोबाईलवर लोकसेविका रेश्मा पाटील यांचे मोबाईल क्र. 7028279566 वरून फोन आला. त्यावेळी श्रीमती रेश्मा पाटील यांचे पती श्री. सदानंद पाटील यांनी सांगितले की, धर्मेश एनओसी बनवेल तेव्हा पैसे घरी घेवुन ये, वहीनी आता ऑफीस मध्ये जाणार नाही. पैसे घेवुन घरी ये. तेव्हा मी, त्यांना चालेल तुमचे घरी येतो. फोन वहीनीला (लोकसेविका) दे. असे सांगितले असता लोकसेविका यांनी फोन घेवुन ''दिड लाख घेवुन ये'' असे सांगितले. तेव्हा मी, दिड लाख चालेल. पण आकाश बोलला. तेव्हा लोकसेविका यांनी ''पंचविस कमी दया सव्वा लाख दया''. तेव्हा मी सव्वा लाख रूपये घेवुन येतो. तुम्ही फोन कराल का एनओसी. तयार झालेवर मग लगेच घरी येईल. तेव्हा श्रीमती रेश्मा पाटील यांनी घेवुन ये असे म्हणुन माझे कडे होर्डींग लावण्याची एनओसी देणेकरीता 1,25,000/रुपये लाचेची मागणी केली.

लोकसेविका सरपंच श्रीमती रेश्मा पाटील यांनी लाचेची मागणी केल्याप्रमाणे त्यांना दयावयाची लाचेची रक्कम 500/रुपये दराच 250 नोटाना अँन्थ्रासिन पावडर लावुन कायदेशीर बांबीची पुर्तता झालेवर सदर नोटा एका लखोटया टाकुन तो लखोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यात ठेवून देण्यात आला.

त्यानंतर मी माझे मोबाईल क्र. 9270707052 यावरून लोकसेविका श्रीमती रेश्मा पाटील यांचे मोबाईल क्र. 7028279566 यावर फोन केला असता, लोकसेविका श्रीमती रेश्मा पाटील यांनी फोन उचलल्यावर त्यांचे पती श्री. सदानंद पाटील यांनी फोन घेवुन ''राहुल तो माणुस कोण होता? आता फोन केलेला फोन कोणाचा होता ? तु पोलीस स्टेशनला आहेस का? असे विचारले. तेव्हा मी तो माझा फोन नंबर आहे. माझेबरोबर आलेला माणुस कंपनीचा होता. तुम्ही बोलले कंपनीचा माणुस पाहीजे म्हणुन आणला होता असे सांगुन एनओसी बाबत विचारणा केली असता सदानंद पाटील यांनी तु येतो का घरी असे विचारले असता मी त्याना एनओसी झाली की,घरी घेवुन येतो असे सांगितले असता लोकसेविकेचे पती यांनी ठिक आहे मग फोन कर नंतर असे सांगुन फोन कट केला.

त्यानंतर मी, पंच श्री. राउत यांना कार क्र. MH04-LB-6393 यामध्ये सोबत घेवुन लाचेची रक्कम देण्याकरीता लोकसेविका यांचे राहते घरी दिवे (अंजुर) येथे गेलो असता, लोकसेविका यांनी ''मयुर ने सोमवारी देता'' असे सांगितले. तेव्हा मी राजकारण बाजुला ठेवा, मला वाटलं तुमचं सगळयांच बोलण झालं असेल म्हणुन तर तुम्ही पैसे अमाऊंट सांगितली. होल्डींगचे दिड लाख घेतात का? असे विचारले असता लोकसेविका यांनी ''वैभव पाऱ्यावाला यांचेकडुन घेतले, बऱ्याच जणाकडुन घेतले.'' असे सांगितले. तेव्हा लोकसेविका यांचे पती यानी सांगितले की, अॅसीबी ऑफिसला मोठे साहेबकडे कोणीतरी कम्पलेट केले की हे पैसे घेवुन एनओसी देतात, क्लीप बनवली. सगळ रेडी करून ठेवलय. मयुर सर्व नाटक करताये. सर्व त्याचच चालत. दोन दिवस थांब. बघु काय होत कम्प्लेंटचं खरा वाटत नाही. खरोखर शहानिशा करू असे सांगुन लाचेची रक्कम स्विकारली नाही.

मी अ.के.अँण्ड कंपनीत नोकरी करीत असुन कंपनीचे मालक श्री. अरूण पाटील यांचे मालकीचा सर्वे नं. 180/1/फ मौजे दिवे अंजुर या जागेवर ''मेर्सस आय.टच. पब्लिसिटी'' यांकपनीचे होर्डींग लावण्याकरीता नाहरकत (NOC) प्रमाणपत्र देणेकरीता ग्राम पंचायत दिवे अंजुरच्या सरपंच श्रीमती रेश्मा पाटील यांनी माझेकडे 1,5000/रुपये लाचेची मागणी केल्याबाबत तक्रार दिली. तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 28/07/2023 रोजी पडताळणीचे वेळी ग्राम पंचायत सदस्य श्री. आकाश जनार्दन म्हात्रे यांनी मॅडम तुला आकडा बोलल्या का? असे विचारले असता मी त्यास मॅडमनी दिड (दिड लाख) बोलल्या असे सांगुन त्यात काहीतरी कमी करा असे बोलले असता आकाश याने''ठिक आहे'' त्यात 25 कमी कर असे सांगितले. त्यावर मी आकाश यांस कोणाकडे देवु ? असे विचारले असता आकाश यानी ''माझेकडे आणुन दे'' असे म्हणुन तडजोडी अंती माझेकडे 1,25,000/रुपये लाचेची मागणी केली. तर लोकसेविका यांचे पती श्री. सदानंद पाटील (खाजगी इसम) यांनी लाचेची ''रक्कम आकाशकडे दे''असे म्हणुन त्यास प्रोत्साहन दिले. तसेच लोकसेविका श्रीमती रेश्मा पाटील, सरपंच यांनी ''1,50,000/रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 1,25,000/रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी करून पैसे घेवुन घरी ये'' असे म्हणुन लाचेची

मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. करीता लोकसेविका श्रीमती रेश्मा सदानंद पाटील, सरपंच-ग्राम पंचायत दिवे (अंजुर), ता. भिवंडी, जिल्हा-ठाणे, लोकसेवक ग्राम पंचायत दिवे (अंजुर) सदस्य श्री. आकाश जनार्दन म्हात्रे व लोकसेविका यांचे पती श्री. सदानंद पाटील (खाजगी इसम) यांचे विरूध्द माझी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे (संशोधन 2018) कलम 7 व 12 प्रमाणे फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.
दाखल अधिकारी-सपोनि शिरसाट
तपास अधिकारी-DYSP श्रीमती माधवी राजेकुभार(अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

MADAN MANOHAR BALLAL(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** MADAN MANOHAR E

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

पोलीस ठाणे अंमलदार
नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी